शासकीय कर्मचारी/अधिकारी यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती प्रकरणी ५ गंभीर आजारांमध्ये सर्व प्रकारच्या कर्करोगांचा समावेश करणे व पाच गंभीर आजारावरिल खर्च भागवण्यासाठी रूपये १,००,००० एवढ्या अग्रीमाची मर्यादा रूपये १,५०,०००/- पर्यंत वाढविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय, क्रमांक एमएजी २००५/प्र.क्र. २५१/आ.३

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक - १० फेब्रुवारी २००६

१) शासन निर्णय सा.आवि.क्र.एमएजी १०८४/४१५७/सीआर-१५६/दि. २९/४/१९८५

२) शासन निर्णय सा.आवि.क्र.एमएजी १०९९/३८३७/आ.९/दि. २३/१/१९८९

३) शासन निर्णय सा.आ.वि.क्र. एमजी १०९५/प्र.क्र.२३८/आ.३, दि.२१/८/१९९९

४) शासन निर्णय सा.आ.वि.क्र. एमएजी १०९५/सीआर - ४५/आ.३, दि ४/७/२०००

५) शासन निर्णय सा.आ.वि.क्र. एमएजी १०९५सीआर-४५/आ.३, दि. ४/७/२०००

६) शासन निर्णय सा.आ.वि.क्र. एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आ.३, दि. १९/३/२००५

निर्णय -

संदर्भाधिन क्र.४ येथे नमूद करण्यात आलेल्या दिनांक ४/७/२००० च्या शासन निर्णयान्वये खाली नमूद पाच गंभीर आजार अंतर्भूत आहेत.

१) हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे

२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया

३) अॅन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया

४) मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया

५) रक्ताचा कर्करोग

वरिल गंभीर आजारांमधये अंतर्भूत रक्ताच्या कर्करोगाशिवाय, इतर सर्व प्रकारच्या कर्करोगाचे वाढते प्रमाण, ...ल गांभीर्य व उपचारावर उद्‌भवणारा खर्च यासर्व बाबी लक्षात घेऊन, अ.क्र.५ येथील रक्ताचा कर्करोग या

ऐवजी कर्करोग असा बदल करण्याची बाब विचाराधीन होती. यास अनुसरून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आ

अ) प्रस्तुत दिनांक ४/७/२००० च्या शासन निर्णयातील विनिर्दिष्ट ५ गंभीर आजारांच्या यादीतील अ.क्र. येथील रक्ताचा कर्करोग या ऐवजी कर्करोग अशी सुधारणा करण्यात येत आहे आणि या आजारावर शासकीय अथ शासनमान्य खाजगी रूग्णालयात आंतररुग्ण तसेच बाह्यरूग्ण उपचारावरिल खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

ब) प्रस्तुत दिनांक ४/७/२००० च्या शासन निर्णयान्वये व उपरोक्त 'अ' येथील सुधारणेसह पाच गंभ आजारांवरिल शासकीय अथवा शासनमान्य खाजगी रूग्णालयातील औषधोपचार व आवश्यक उपकरणांची खरे करण्यासाठी येणारा संभाव्य खर्च विचारात घेऊन प्रचलित रू.१,००,०००/- अग्रीमाची मर्यादा रूपये १,५०,००० (रू.एक लाख पन्नास हजार फक्त) एवढी वाढविण्यात येत आहे.

क) अग्रीम मंजूर करण्याबाबतचे सर्वसाधारण नियम संदर्भाधीन अ.क्र.५ येथील शासन निर्णय दि.४/७ २००० सोबतच्या परिशिष्ट अ प्रमाणेच राहतील.

३. हे आदेश शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून अंमलात येतील, तथापि या आदेशाच्या दिनांकापूर्वी कालावधीत औषधोपचार घेतलेल्या अनिर्णित प्रकरणांना अथवा आदेशाच्या दिनांकास औषधोपचार सुरू असणा प्रकरणानां देखील हे आदेश लागू राहतील. मात्र या आदेशाच्या दिनांकापूर्वी निर्णयीत झालेली प्रकरणे पुन्हा सु करण्यात येऊ नयेत.

४. सदर आदेश महाराष्ट्र राज्याचे मंत्री महोदय, विधानमंडळाचे सभापती, उपसभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, महार विधानमंडळाचे विद्यमान व माजी सदस्य, शासकीय कर्मचारी व सर्वांचे कुटूंबिय यांना लागू राहतील.

५. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१३/सेवा -५, दिनांक १९ जानेवा २००६ नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

र.मो. अ

कार्यासन अ( )